बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र.प्रअभि/विनि/ ३५७२६ /साधारण, दि.२२.०३.२०१९

**परिपत्रक क्र.प्र.अ/विनि/६२/साधारण, (२०१८-१९)**

विषय: वस्तुंच्या साठयांचे पावसापासून संरक्षण करण्याकरिता तात्पुरत्या पावसाठी छपऱ्या बांधण्याची परवानगी देताना आकारण्यात येणाऱ्या शुल्क रचनेत सुधारणा करण्याबाबत.

मुंबई महानगरपालिकेने ठराव क्र.११६१ दि.१२.०१.२०१८ नुसार खालील नमूद तक्त्यात दिलेल्या पुनर्रचित शुल्काची अनुसूची सन २०१७-१८ करिता महानगरपालिकेची मंजूरी प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सुधारित दरानुसार शुल्क आकारण्यास, तसेच सन २०१७-१८ नंतर येणाऱ्या पुढील प्रत्येक आर्थिक वर्षात १ एप्रिलपासून पुढील नविन धोरण निश्चित होईपर्यंत रु.५००/ पर्यंतच्या विद्यमान आकार शुल्कामध्ये १० टक्के इतकी वाढ करुन येणारी रक्कम अपूर्णांकात असल्यास सुधारित शुल्क दर पुढील रुपयाच्या पूर्णांकात लागू करण्याबाबत व रु.५००/- पेक्षा अधिक विद्यमान आकार शुल्कमध्ये १० टक्के इतकी वाढ करुन येणारे सुधारित शुल्क दर पुढील १०/- च्या पूर्णांकात लागू करण्याबाबत मंजूरी प्राप्त झाली आहे.

त्यानुसार महानगरपालिकेच्या मंजूरी दिनांकापासून म्हणजेच दि.१२.०१.२०१८ पासून सुधारित दर लागू करण्याबाबतचे परिपत्रकक्र.पअभि/विनि/३०४९१/साधारण नुसार निर्गमित करण्यात आले होते. तसेच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता दि.०१.०४.२०१८ पासूनच्या सुधारित दराबाबतचे परिपत्रक क्र.प्रअभि/विनि/३६९५०/साधारण दि.३१.०३.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे.

आता, सन २०१९-२० करिता दि.०१.०४.२०१९ पासून खालीलप्रमाणे सुधारित दर लागू करण्यात आले आहेत.

| अ. क्र. | वर्णन | दि.०१.०४.२०१८ पासून लागू केलेले दर शुल्क (रु.) | सन २०१९-२० या वर्षाकरिता दि.०१.०४.२०१९ पासून लागू करण्यात आलेले दर (म.न.पा. ठराव क्र.११६१) दि.१२.०१.२०१८ शुल्क (रु.) |
|---|---|---|---|
| १ | खराब हवामान, अतिवृष्टी यापासून संरक्षण, रहिवाशांच्या, जनतेच्या, चित्रपटगृहांच्या/ नाटयगृहांच्या प्रेक्षकांकरिता, कारखान्यातील कामगार, शाळकरी मुले, रुग्णालयातील रुग्ण यांच्या सोयीकरताच बांधलेल्या पावसाळी छपऱ्या जेथे कोणताही जादा नफा अथवा व्यक्तिगत लाभ घेण्याचा हेतू नाही. | रु.३८/- प्रति चौ.मी.या दराने शुल्क | रु.४२/- प्रति चौ.मी.या दराने शुल्क |
| २ | मालास नुकसान पोहोचू नये यादृष्टीने संग्रह केलेला माल यंत्र सामगीचे संरक्षण करण्याच्या हेतूने बांधलेल्या तसेच एरव्ही व्यावसायिक व औद्योगिक आस्थापनांकडून मोकळया जागेवर चालणारे उपक्रम चालू ठेवण्याच्या हेतूने बांधलेल्या मान्सून छपऱ्या, कारखान्याच्या आवारात मालाचा तात्पुरता संग्रह करण्याकरिता मोकळया जागा तसेच त्यांच्या संरक्षणाकरिता छपऱ्या. | रु.३६८०/- प्रति १० चौ.मी. या दराने अथवा त्यातील काही भाग १० चौ.मी. पेक्षा अधिक क्षेत्राकरिता रु.३६९/ प्रति अतिरिक्त चौ.मी. | रु.४०५०/- प्रति १० चौ.मी.या दराने अथवा त्यातील काही भाग १० चौ.मी.पेक्षा अधिक क्षेत्राकरिता रु.४०५/- प्रति अतिरिक्त चौ.मी. |

मात्र, महानगरपालिकेच्या दि.१० मे, २००२ च्या ठराव क्र.१८५ नुसार, तात्पुरत्या पावसाठी छपऱ्या, त्यांच्या विहित कालावधीनंतर लगेच न काढल्यास व परवानगी देताना घातलेल्या अटींचे उल्लंघन केल्यास, अर्जदाराच्या परवान्याचे नूतनीकरण करताना परवानगी शुल्काइतकाच दंड आकारण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| सही/- (१९.०३.२०१९) | सही/- (१९.०३.२०१९) | सही/- (२०.०३.२०१९) |
| कार्यकारी अभियंता | उप प्रमुख अभियंता | प्रमुख अभियंता |
| (विकास नियोजन) शहर | (विकास नियोजन)-१ | (विकास नियोजन) प्र. |

D:\DP-8-2018\General\टिप्पणी.doc-4